महासागर अमरावती
पान 3
शनिवार दि. 14 सप्टेंबर 2024

# सराफा व्यवसायीकाला लुटणाऱ्या टोळीत बडतर्फ पोलिसाचाही सहभाग



## आणखी तिघे जेरबंद

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.13) -** बंदुकीचा धाकावर जवाहरनगरातील सराफा व्यवसायीकाजवळील 25 किलोची चांदी लुटून नेणार्या आंतरराज्यीय टोळीतील आणखी तिन आरोपी जेरबंद करण्यात आले. संजय बाबुराव बिनकर (40, रा. मुळचा मुनीपुरया, जि. प्रतापगड, ह.मु.सुरेंद्रगड, नागपूर), प्रेमदास मधुकरराव नितनवरे (रा. छत्रसालनगर, अमरावती) व विनोद शंकरराव गिरे (45, रा. दर्यापूर) अशी आरोपींची नावे आहेत.

अरविंद उत्तमराव जावरे यांच्या फिर्यादवरून गाडगे नगर पोलिस ठाण्यात या लुटमारीचा गुन्हा नोंद करण्यात आला होता. याप्रकरणात यापूर्वी गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गयासुदिन यहाजउद्दीन कुरेशी व व मोहम्मद साजिक खान मोहम्मद यांना अटक केली आहे. पोलिसांनी आरोपी गयासुदिनची चौकशी केल्यानंतर, त्यांना जावरे यांच्याविषयीची माहिती संजय बीनकरने दिल्याचे सांगितले होते. या माहितीवरून 12 सप्टेंबर रोजी सदर इसमाबाबत माहिती घेतली असता सदर इसम गिट्टीखदान नागपूर या भागात मिळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन नाव विचारले असता त्याने त्याचे नाव संजय बाबुराव बीनकर असे सांगितले. जावरे हे दुकानात सोन्या-चांदीचे दागिने घरी घेऊन जातात, असे त्याला त्यांच्या ओळखीचा मित्र प्रेम नितनवरे पोलिस वाला यांनी सांगितल्याची माहिती पुढे आली. या माहितीवरून पोलिसांनी प्रेम नितनवरेला अमरावती येथील छत्रसाल नगरातून ताब्यात घेतले.

### चार ते पाच महिन्यापूर्वी लुटण्याचा प्रयत्न अपयशी

त्यानंतर जावरे यांना लुटण्याचा प्रयत्न त्यांनी चार ते पाच महिन्यापूर्वीचा होता, परंतु तो प्रयत्न अयशस्वी ठरला होता. परंतु सदर माहिती ही गॅसउद्दीनला होती. त्यामुळे त्यांनी सदर गुन्ह्याच्या घटनेदिवशी त्याच्या इतर साथीदारासह संजय बीनकर, प्रेम नितनवरे व विनोद गिरे याला डावलून त्याच्या इतर साथीदारासह घटनेला अंजाम दिला होता.

### या पथकाची धडाकेबाज कारवाई

सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, बाबाराव अवचार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, संजय वानखडे, पोलिस हवालदार फिरोज, सतीश देशमुख, अलीमुद्दीन खतिम, नाईक पोलीस अंमलदार नजीमुद्दीन सय्यद, विकास गुडदे, पोलीस अंमलदार सुरज चव्हाण, निखिल गेडाम, अमोल मनोहरे, चालक रोशन माहुरे, किशोर खोंगरे, यूनिट दोनचे पोलिस हवालदार गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, चेतन कराडे, योगेश पवार, निलेश वंजारी, सागर ठाकरे, राजीक रायलीवाले, संदीप खंडारे, चेतन शर्मा यांनी केलेली आहे.

### बडतर्फे पोलिस शिपायाची टिप

पोलिसांनी त्याची चौकशी केल्यानंतर तो पोलीस विभागातून बडतर्फ झालेला पोलीस शिपाई असल्याचे आढळून आले. जावरे हे दुकानातून सोने च चांदीचे भांडे घरी नेतात आणि पुन्हा सकाळी दुकानात नेतात, अशी माहिती त्याला त्याचा मित्र विनोद गिरेने दिल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी सदर इसमाला दर्यापूर येथून ताब्यात घेतले. त्यानंतर माहिती पुढे आली की, विनोद गिरेला जावरेंची माहिती होती. त्यांनी ती माहिती मित्र प्रेमदास नितनवरेला दिली. त्याने ती त्याचा मित्र संजय बिनकरला दिली आणि त्यानंतर बिनकर ही माहिती आरोपी गयासुद्दीन व त्याच्या इतर मित्रांना दिली होती.

# हृदयद्रावक! वडिलांच्या पार्थिवाला खांदा देत मुखाग्नी दिला

## 19 वर्षीय मुलींने पार पाडलं मुलाच कर्तव्य





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, (दि. 13) -** मृत्यूनंतर पार्थिवाला मुलाने खांदा द्यावा आणि त्यानेच अग्निडाग द्यावा, अशी प्रथा आहे. मात्र, या सर्व रीतीरिवाजांना फाटा देत अंजनगाव तालुक्यातील कालवाडा मुऱ्हा येथे एका मुलीने वडील बंडू पाटील काळे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिवाला खांदा दिला. बंडू पाटील काळे यांना तीन मुली आहेत त्यातील सर्वात लहान असलेल्या असलेल्या कु.निकिताने अग्निडाग दिला.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कालवाडा मुऱ्हा येथील बंडू पाटील काळे वय 55 वर्षीय हे मागिल चार वर्षांपासून कर्करोगाशी सामना करत होते. अखेर त्यांची मृत्यूशी झुंज 13 सप्टेंबर रोजी संपली .त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुली आहेत. त्यापैकी दोघी मुलींचा विवाह झालेला आहे. बंडू पाटील काळे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार कोणी करावे, असा प्रश्न निर्माण झाला. बंडू पाटील काळे यांना एक भाऊ आहेत. त्यांच्या हस्ते अंत्यसंस्कार करावा, असा सल्ला काहींनी दिला. त्यासाठी रीतीरिवाज आणि धर्मशास्त्राचे दाखले देण्यात आले.

वडिलांच्या मृत्यूच्या दुःखात असलेल्या मुलींपर्यंत ही चर्चा गेली आणि तिन्ही मुलींनी आपले दुःख आवरत आम्हीच आमच्या वडिलांवर अंत्यसंस्कार करू, असा निर्णय घेतला. त्यानंतर काहींनी या निर्णयाला विरोधही केला. मात्र, आमच्या वडिलांचा अंत्यसंस्कार आम्हीच करू. आम्हीच त्यांचे मुलं आहोत, असे ठामपणे पाटील यांच्या तिन्ही मुलींनी उपस्थित सर्वांना सांगितले. बंडू पाटील यांच्या दोन मुलींचे लग्न झाले त्यातील मोठी मुलगी नम्रता गौरव वानखडे ही एक महिन्याची बाळंतीण आहे दुसऱ्या नंबर मुलगी अंकिता अमोल ठाकरे हिचा नववा महिना चालू असल्याने नातेवाईकांनी दोन्ही मुलींना वडिलांच्या पार्थिवाचे दर्शन करून घरीच थांबण्याचा सल्ला दिला.

त्यानंतर कु अंकिता आणि जावयांनी वडिलांना खांदा दिला. तसेच अंकिताने बंडू पाटील यांच्या पार्थिवास अग्निडाग दिला. हिंदू रितीरिवाजांनुसार अंत्यसंस्कार केले. हे दृश्य पाहून काही लोक रडायला लागले. हिंदू धर्मामध्ये महिलांना स्मशानभूमीत जाण्यास मनाई आहे. पण आता समाजातील जुन्या परंपरा आणि समजुती मोडून लोक पुढाकार घेत असलेलं पाहायला मिळत आहे. अशाप्रकारे मुलींने वडिलांवर अंत्यसंस्कार केले असून नवा आदर्श निर्माण केला आहे.

# दुचाकी चोरटा गजाआड, एक दुचाकी जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 13) -** दुचाकी चोरी करणार्या एका चोराला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अचलपुर परिसरातून अटक केली. भारत मक्कु धोत्रे (26,रा. सलोना ता. चिखलदरा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 25 हजार रुपये किमंतीची एमएच 27 बि एस 6958 या क्रमांकाची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांनी अमरावती ग्रामिण हद्दीतीत वाढत्या दुचाकी चोरीच्या घटनाना आळा बसविण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करुन गुन्हे उघडकिस आणण्याच्या सुचना निर्गमीत केल्या होत्या. त्या अनुषंगगाने पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांचे स्वतंत्र पथक स्थापन करण्यात आले होते. 11 सप्टेंबर रोजी सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार व त्यांचे पथकातील अमंलदार हे अचलपुर उपविभागात पेट्रोलोग करित होते. दरम्यान त्यांना गोपनिय माहीती मिळाली कि, ग्राम सलोना येथे राहणारा भारत मक्कु धोत्रे हा चोरीची दुचाकी विक्री करण्याकरीता लोकांना विचारपुस करीत आहे. तो सध्या चिखलदराकडुन धामनगाव गढीकडे पॅशन प्रो गाडी घेवून येत आहे. या माहीतीवरुन पोलिसांनी सापळा रचुन आरोपीला ताब्यात घेतले.

त्यावेळी त्याने सांगितले की, मी व माझा मित्र असे दोघांनी मिळून ही दुचाकी अचलपुरातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधून चोरी केल्याची कबुली दिली आहे. यावरुन पोलिसांनी त्याच्या ताब्यातुन 1 काळया रंगाची ग्रे पटटा असलेली हिरो कंपनीची पॅशन प्रो दुचाकी जप्त केली. नमुद मुद्देमाल व आरोपी पुढील कार्यवाहीकरीता अचलपुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहा. पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस अमंलदार युवराज मानमोठे, रविन्द्र वर्हाडे, स्वप्निल तंवर, सागर नाठे, शांताराम सोनोने, चालक राजस, सायबर अंमलदार शिवा शिरसाट यांनी केली.

# दोन दुचाकींची भीषण धडक, दोघे ठार

## वरुड हद्दीतील तिवसा घाट रोडवर घटना



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, (दि. 13) -** भरधाव व अनियंत्रीत दोन दुचाकी एकमेकांवर आदळून झालेल्या अपघातात दुचाकीवरील दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी रात्री 8.30 वाजताच्या सुमारास वरुड ते तिवसाघाट रस्त्यावरील महारुख बन परिसरामध्ये घडला.

एम.एच.27 एन 1834 या क्रमांकाच्या दुचाकीवरुन शकील मन्सुरी शफी मन्सुरी (34) व संकेत अरुण काळे (28, दोघेही रा. बालापेठ शेंदुरजनाघाट) हे शेंदुरजनाघाटाकडे जात असतांना त्यांच्या दुचाकीला गोपाल शिरजी कुमरे (23) व निलेश संताराम उईके (31, दोन्ही रा.रवाळा) यांची एम.एच.32 के 7390 या क्रमांकाची दुचाकी समोरासमोर धडकली. या अपघात घडताच दोन्ही दुचाकीवरील चौघेही गंभिर जखमी झाले. यातील शकील मन्सुरी शफी मन्सुरी (34) व गोपाल शिरजी कुमरे (23) या दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे गंभिर जखमी झाले. या अपघातानंतर काही नागरिकांनी जखमींना ग्रामीण रुग्णालयात नेले. परंतू डॉक्टरांनी गोपाल कुमरे व शकील मन्सुरी यांना मृत घोषीत केले, तर निलेश उईके व संकेत काळे यांचेवर प्राथमिक उपचार करुन दोघांनाही पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे. अपघाताची माहीती मिळताच नातेवाईक आणि बघ्यांच्या गर्दी ग्रामीण रुग्णालय परिसरामध्ये झाली होती. अपघातातील दोघांचा मृत्यू तर दोघे अत्यवस्थ असल्यामुळे दोन्ही दुचाकी नेमक्या कोणत्या दिशेने जात होत्या आणि नेमका अपघात कशामुळे झाला? याबाबत माहीती मिळु शकली नाही. घटनास्थळी शेंदुरजनाघाट पोलिसांनी तातडीने धाव घेतली आणि तपास आरंभिला होता.

# राहुल गांधींच्या पोस्टरवर मारल्या चप्पला





## इर्विन चौकात भाजपचे आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 13)-** लोकसभेतील विरोधी क्षनेते राहुल गांधी यांच्या अमेरीकेतील आरक्षणासंदर्भातील विधानावर भाजपाने आक्रमक पवित्रा घेतला असून शहरातील भाजपच्या नेत्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारून आणि प्रतिमा जाळून निषेध केला. शहर आणि ग्रामीण भाजप असे दोन वेगवेगळे आंदोलने शुक्रवारी करण्यात आली. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करून घोषणाबाजी करण्यात गली. त्यानंतर राहुल गांधी यांचा प्रतिकारात्मक पुतळा जाळण्यात आला.

आरक्षणविरोधी भूमिका काँग्रेसने घेऊ नये, अन्यथा भाजप त्यांना फिरू देणार नाही, असा इशारा भाजप अनुसूचित जाती सेलचे सिद्धार्थ वानखडे यांनी दिला. यावेळी भाजपचे प्रवक्ते शिवराय कुळकर्णी उपस्थित होते. भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असे राहुल गांधी म्हणाले होते. अमेरिकेत राहुल गांधींनी आरक्षणावरुन हे वक्तव्य केले, मात्र त्यांच्या या वक्तव्याचे देशात आता पडसाद उमटत आहेत. सत्ताधारी पक्षाने त्यांना यावरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. राहुल गांधी यांच्यावर टीका करीत आहेत. आरक्षण विरोधी काँग्रेसचा चेहरा समोर आला असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

मतांसाठी आरक्षणावरुन कसा खोटा नरेटिव्ह केला. हे राहुल गांधींच्या वक्तव्यातून दिसले, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर काँग्रेसची खरी आणि संविधान विरोधी भूमिका राहुल गांधींच्या तोंडून आता समोर आली आहे. अशी टीका भाजपच्या नेत्यांनी केली आहे. त्यांच्या वक्तव्याचा भाजपकडून राज्यभर निषेध केला जात आहे. तर खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात ग्रामीणचे भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी एकत्र येत त्यांनी हि जोरदार आंदोलन केला, यावेळी आ. प्रताप अडसड हे हि उपस्थित होते.

# 108 रुग्णवाहिकेची तोडफोड

## मोर्शी उपजिल्हा रुग्णालय परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, (दि. 13) :** मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात अज्ञात समाजकंटकांनी प्रवेश करून रुग्णालयात उभी असलेली 108 रुग्णवाहिका (ॲम्बुलन्स) व खाजगी गाडीच्या काचा फोडल्यामुळे अधिकारी व कर्मचार्यामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर घटना 12 सप्टेंबरच्या रात्री 11:30 वाजता घडली. ही गंभीर स्वरूपाची घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून त्याआधारे मोर्शी पोलीस अज्ञात समाजकंटकाचा शोध घेत आहे. याबाबतचे एक लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

मोर्शी उपजिल्हा रुग्णालय येथे 8 सप्टेंबर रोजी रात्री 10 वाजता स्वत:ला रुग्णसेवक व रुग्णसेविका म्हणवुन घेणार्या युवकांनी स्वाती ठाकूर या महिला रुग्णाला अमरावतीला का रेफर केले ? याबाबत रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक त्यांचे सोबत हुज्जत घालून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेच्या तब्बल चार दिवसानंतर 12 सप्टेंबर रोजी रात्री 11:30 वाजता फोर व्हीलर गाडीने येऊन अज्ञात समाजकंटकांनी उपजिल्हा रुग्णालय परिसरात प्रवेश करून रुग्णालयात उभ्या असलेल्या 108 रुग्णवाहिका(ॲम्बुलन्स) व नम्रता बोराळे यांच्या मारुती नेक्सा गाडी क्र. एम एच 30 बी एल 0116 वर दगडफेक करून गाडीच्या काचा फोडल्या. विशेष म्हणजे बोराळे यांच्या खाजगी गाडीत त्यांचे पती झोपलेले होते.

त्यांना वरून गाडीवर काहीतरी पडल्याचा भास झाला ते गाडीमधून बाहेर पडताच अज्ञात समाजकंटकांनी तेथून पलायन केले.

या घटनेत बोराळे यांच्या पतीची जीवितहानी सुद्धा होऊ शकली असती मात्र सुदैवाने त्यांचे प्राण वाचले. या दगडफेकीच्या गंभीर प्रकरणामुळे उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिकारी, कर्मचारी, दवाखान्यातील भरती रुग्ण यांच्यामध्ये व गावातील नागरिकांमध्ये कमालीची दहशत निर्माण झाली आहे. दिवसेंदिवस रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांना रुग्णसेवा देण्यास अडथळा निर्माण होत असून त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होत आहे. गंभीर घटनेचा मोर्शी पोलिसांनी योग्य तपास करून दोशी समाजकंटकावर कडक कार्यवाही करण्यात यावी.अशी मागणी रुग्णालयातील अधिकारी कर्मचारी व गावकर्याच्या वतीने करण्यात आली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४



पान 6

# महासागर अमरावती

शनिवार दि. 14 सप्टेंबर 2024




# खा.बळवंत वानखडे यांचा सत्कार

## सन्मानपत्रातून व्यक्त केल्या भावना

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.13 )** – स्थानिक ओंकार स्वरूपा कला अँकेडमी मार्फत संस्था मार्गदर्शक डॉ.राजेंद्र कोकाटे लिखीत सन्मानपत्र, प्रसिध्द पत्रकार रविशकूमार लिखीत %आपको बोलणाही है% हे पूस्तक देऊन खासदार बळवंत वानखडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सन्मानपत्राचे वाचन स्मीता घोगरे यांनी केले.

याप्रसंगी सत्कार कार्यक्रम अध्यक्ष बाळासाहेब हिगंणीकर, माजी आ.रमेश बूंदिले, उदघाटक गुणवंत देवपारे, जाधव इंडट्रीज चे संचालक तथा सनदी लेखापाल (सी.ए.) विजय जाधव, नितेश वानखडे व ओंकार स्वरूपा सांस्कृतीक अँकेडमीचे संस्थापक अध्यक्ष धर्मराज शिरोळे, डॉ.श्रीकृष्ण गोरडे, राजेश गुरव, दिपक जावरकर, अँड.निलेश धोपे, संदिप श्रीवास्तव व परतवाडा येथील उद्योजक राहूल ठाकरे उपस्थित होते. याप्रसंगी वैरागड या दूर्गम आदिवासी क्षेत्रात सेवा प्रदान करून निवृत झालेले शिक्षक दिगांबर वानखडे, अंजनगांव पत्रकार संघाचे अध्यक्ष सूधाकर टिपरे तथा अँड.श्रीकांत मेहश्रे यांचा संविधानाची प्रत देवून गौरव करण्यात आला. विचारमंचावरील सर्व मान्यवरांचे पूष्पगूच्छ तथा भारताचे संविधान ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी. कार्यक्रमाचे संपुर्ण सुत्रसंचालन आदर्श शिक्षक वासुदेवराव काळे यांनी केले. तर हेमलता लेंधे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी मिना बूंदिले, मिना कोल्हे, संगीता गोरडे, लता शिरोळे, डॉ.राजेंद्र सरोदे, धीरज जयस्वाल, डॉ.नंदकिशोर पाटील तथा चादूंरबाजार येथील उद्योजक मोहन विधळे हे आर्वजून उपस्थित होते. धर्मराज शिरोळे, प्रतीक्षा, शितल उत्कृष्ट वाद्यकलावंतानी प्रसिध्द 'रिमझीम गीरे सावन' हे गाणे गात मान्यवरांसह शेकडो रसीकांना मंत्रमूग्ध केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# संत्रा फळगळ सुरूच, शासनाच्या मदतीची प्रतीक्षा!

## मोर्शी वरुड तालुक्यातील शेतकरी हवालदिल

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड, ( दि.13 )**– वातावरणातील बदल बुरशीजन्य रोग उच्च, पोषक तत्त्वाची कमी, शेतातील पाण्याचा निचरा न होणे यासह अन्य कारणांमुळे संत्राच्या आंबिया बहाराची मोठ्याप्रमाणात गळ होत आहे. ज्यामूळे मोर्शी तालुक्यातील हिवरखेड परिसरातील संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. आता शेतकऱ्याला शासनाच्या मदतीची प्रतीक्षा आहे.



पक्व होण्याच्या प्रक्रियेतील संर्त्याची गळ होऊन झाडाखाली फळांचा खच पडताना दिसतोय. एका मागे एक संकटाच्या मालिकेत आता सततच्या पावसामुळे शंकूचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. संत्रा झाडावर येणाऱ्या रोगामुळे व यावर्षी झालेल्या अती पावसामुळे आंबीया बहाराच्या संत्राची मोठ्या प्रमाणात गळ झाली. संत्रा, मोसंबी फळपिकांच्या आंबिया बहाराच्या फळांवर बुरशी व किटकांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे फळगळ तसेच फळांच्या गुणवत्तेवर परीणाम दिसून येतो. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून आलेले पीक हातून निघून जात आहे. जे झाडाला आहे त्याची गुणवत्ता खालावत असून त्याची पण गळ होऊ शकते. तसेच योग्य तो भाव मिळण्याची संधी पण खूप कमी झाली आहे. रोग व किडीचं व्यवस्थापनेसाठी परीणामकारक उपाययोजना करणे गरजेचे ठरते. ज्यामध्ये विविध प्रकारची फवारणीचा समावेश असतो परंतु सतत सुरु असलेल्या पावसामुळे आणि झाडाची गुणवत्ता अत्यंत खालावली असल्यामुळे फवारणी करुन पण काहीच फायदा होताना दिसत नाही आहे. नगदी पीक समजल्या जाणारे संत्रा पिक हातून निघून गेल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. काही ठिकाणी फळमाशीचा सुद्धा प्रादुर्भाव दिसून आलेला आहे. प्रौढ मादी फळमाशी सालिखाली एक वा अनेक अंडी घालते. तीन ते पाच दिवसांत अंडी उबून मळकट पांढऱ्या रंगाच्या लहान पाय असलेल्या अळ्या बाहेर पडतात. या अळ्या फळामध्ये शिरून रस व गर खाऊन टाकतात त्यामुळे फळाचा नाश होतो त्याची गुणवत्ता घटते. अंडी घालताना जिथे छिद्रे पडलेली असतात तो भाग इतर

रोगजंतुनी संक्रमित होऊन होऊन तिथे पिवळे डाग पडतात आणि अकाली फळगळ होते. फळ दाबले असता फळातून छिद्रे असलेल्या जागेतून पिचकारी सारखे फवारे उडतात. अशा प्रकारचे फळ आपोआप गळून पडते. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. एवढा फवारणीचा खर्च करुन अगोदरच शेतकरी आर्थिक संकटात आहे वरून ही नैसर्गिक आपदा येऊन ठेपली आहे. हा हवालदिल झालेला शेतकरी आता शासनाच्या मदतीच्या प्रतीक्षेत असून खरीपातील पीक बाधित होत असतानाच यंदा संर्त्याच्या दोन्ही बहाराला ग्रहणच लागले आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणात फळगळ होत असल्याचे दिसून येत आहे. बाधित झाडांचा सर्वे करण्याची मागणी हिवरखेड व परिसरातील शेतकरी करीत आहे. बदलत्या वातावरणात व रोगाने अति पावसामुळे संत्रा झाडे पिवळी पडून वाळू लागल्याने विदर्भाचा कॅलिफोर्निया नष्ट होण्याच्या मार्गावर दिसून येत आहे. यावर्षी आंबिया बहार मोठ्या प्रमाणात जानेवारी मध्ये फुलला होता मात्र मार्च ,एप्रिल महिन्याच्या निसर्गाच्या लहरीपणामुळे त्यावेळी सुद्धा मोठ्या प्रमाणात गळ तर पावसाळा सुरू होताच सततच्या पावसामुळे संत्रा गळ मोठ्या प्रमाणात दिसून आली आहे. संत्रा उत्पादन घेणाऱ्या हिवरखेड, दापोरी, लोणी, मोर्शी, वरुड परिसरात आंबीया बहराची मोठ्या प्रमाणात गळती सुरूच आहे.

### शेतकऱ्यांची चोहोबाजूंनी कोंडी

शेतमालाला भाव नसल्यावर, योग्य बाजारपेठ नाही, व्यापारी भाव नियंत्रण करणारे आहेत, बँका कृषी कर्ज नाकारणाऱ्या आहे, शेतात काम करणारा मजूर उपलब्ध नाही किंवा खूप जास्त मजुरी खर्च येतो, त्यामध्ये असे नैसर्गिक संकट अशी चोाहोबाजूंनी कोंडी होत असल्याने राब राब राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत.

# श्री रामदेवबाबा यात्रा महोत्सव आज

## सकाळी 9 वाजता निघणार पालखी

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.13 )**– दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा श्री रामदेव बाबा भादवा मेला उत्सव आज शनिवार दि. 14 सप्टेंबर ला आयोजित करण्यात आलेला आहे. या मेला उत्सवात अमरावती येथील सुप्रसिद्ध भजन गायक मनमोहन जाजू आपल्या मधुर वाणीतून सायंकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत भजन व जम्मा जागरण प्रस्तुत केल्या जाईल.

येथील विदर्भ विख्यात श्री रामदेव बाबा मंदिरात वर्षातून दोन वेळा मेला उत्सव साजरा केला जातो. यात भादवा मेला उत्सवाला अनन्य महत्व असून या दिवशी रामदेव बाबांची पालखी शोभायात्रा शहरातून आयोजित करण्यात येते. उद्या शनिवारी सकाळी 9 वाजता भव्य पालखी यात्रेचे आयोजन सुद्धा करण्यात आले आहे. श्री रामदेव बाबा मंदिर परिसरातून संपूर्ण नगर भ्रमण करून पालखी यात्रा पुन्हा श्री रामदेव बाबा मंदिरात प्रवेशित होते. यादरम्यान धामणगाव नगरीत पालखी यात्रेचे भव्यदिव्य स्वागत भक्तमंडळी करीत असते मंदिरात पूजा-अर्चना आरती होत असते.



### विविध वस्तूंचे स्टॉल सजले


मंदिर परिसर ते हुतात्मा भगतसिंग चौकापर्यंत मेला उत्सवाचे आयोजन करण्यात येते. या उत्सवादरम्यान विविध प्रकारची दुकाने उपयोगी वस्तू धार्मिक पुस्तक तसेच खाण्यापिण्याचे दुकानांचे वस्तूंची स्टॉल लावण्यात येतात. उत्सवामध्ये शेकडो लोकांची गर्दी तसेच भक्तांची सुद्धा मोठ्या प्रमाणात संख्या असते दर्शन व मेला उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन श्री रामदेव बाबा मंदिर ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे.

# चेथर गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची दुरावस्था

## रस्त्यात खड्डे आहे, की खड्डयात रस्ता

**महासागर प्रतिनिधी**
**धारणी, ( दि.13 )**– तालुक्यातील चेथर गावात जाण्यासाठी धारणमाहू वरून बैरागड मार्गावर फाटा असून त्यातून आत घनदाट जंगलातून रस्ता आहे. या रस्त्याची अत्यंत द्यनीय अवस्था झाल्याने नागरिकांचे हाल होत आहे. सुरवातीला सदर रस्ता सामान्य रस्त्यासारखा वाटतो. मात्र नंतर जसजसे गाव जवळ येतो रस्त्यात खड्डे आहे, की खड्डयात रस्ता हेच कळत नाही. दुचाकी वाहनाने गावात जाणे म्हणजे जीवाशी खेळ केल्याप्रमाणे आहे.

सदर रस्ता हा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या आधीपत्याखाली येत असल्याने बांधकाम विभागाचा याकडे लक्ष नाही. याबाबत ग्रामपंचायत ने जि.प. बांधकाम वेळोवेळी सुचना देवूनही याकडे दुर्लक्ष करण्यात आले.एखाद्या आजारी व्यक्तीला आणीबाणीचा सेवा देताना येथे



रुग्णवाहीका पोहोचणेही कठीण आहे. गावकऱ्यांना धारणी जाण्यासाठी धारणमहू पर्यंत चालत जावे लागते. जंगलाचा मार्ग असल्याने वन्यजीवांची भीती असते. दुर्गम भाग असल्याने गावकऱ्यांना नेमकी या प्रकाराची तक्रार कोठे करावी हेच कळत नाही. मात्र गावकऱ्यांनी आगामी काळात विधानसभा निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.

# धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची स्थापना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.13 )**– राज्य शासनातर्फे धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मीटर टॅक्सीचालक कल्याणकारी मंडळ स्थापना करण्यात आली आहे.

ऑटो-रिक्षा परवाना धारक, ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनेंतर्गत जीवन विमा अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास 50 हजारापर्यंत अर्थसहाय्य योजना, पाल्याच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्यवृद्धी योजना, 65 वर्षावरील ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान, नवीन ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज इत्यादी, ऑटोरिक्षा परवानाधारक ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत रावण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना राबविणे. मंडळाच्या कल्याणकारी निधीचे विनियोजन व व्यवस्थापन करणे इत्यादी मंडळाचे उदिष्टे आहे.

# सेंट्रल बँकसमोर दलालांचा सुळसुळाट

## ग्राहकांची आर्थिक लूट




**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.13 )** – अंजनगाव बारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा येथे दलालांचा वावर असुन ग्राहकांच्या आर्थिक लुटीची तक्रारी येत असुन दलालांचा बंदोबस्त करण्याची मागणी संबंधित प्रशासनाकडे ग्राहकांनी केली आहे. बॅकेच्या समोरील आवारात अतिक्रमण जागेत दलालांच्या वावर असल्यामुळे रस्त्यावर ये-जा करणाऱ्याची गर्दी होत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

बँकेत ग्राहक विविध आर्थिक व्यवहार करण्यासाठी येतात त्यावर हे दलाल डोळा ठेवून आर्थिक लुट करतात. वृद्ध, महिलावर्ग यांना आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या घटना तसेच पर्यायी कामांसाठी जास्तीची रक्कम वसूल करत असल्याच्या घटना समोर येत आहे.

यामुळे अशा दलालांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्राहकांची व ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने योग्य ती कडक कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याचेही समजते.



परतवाडा- येथील साई प्रिंटर्स चे संचालक विवेक अंबुलकर यांच्याकडील महालक्ष्मी.



अंजनगाव सुर्जी- येथील पंचायत समितीचे उपसभापती नितीन पटेल ( पांढरी खानमपुर ) यांच्याकडील महालक्ष्मी.

# श्री सिध्दक्षेत्र मुक्तागिरीतील सातपुडा पर्वताने पांघरला हिरवा शालू

- जैन धर्मीयांचे तीर्थक्षेत्र असलेल्या मुक्तागिरीत पवित्र पर्युषण पर्व सुरू
- धुक्याची चादर व धबधब्या चे शुभ्र तुषार घालतात भुरळ

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.13 )**– महाराष्ट्र सीमेलगत असणाऱ्या व मध्यप्रदेशातील जैनांची काशी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या मेंढागिरी व सध्याचा मुक्तगिरी गेल्या महिन्यापासून सुरू असलेल्या दमदार पावसाने मुक्तागीरी च्या चोहिकडे असणाऱ्या सातपुडा पर्वताने जणू हिरवा रंगाचा शालू परिधान केला असल्याचे भासत आहे. तर प्रवेश निषेध असलेल्या 250 फूट उंचावरून कोसळणारा मनमोहक धबधबा चांगला मुसळधार सुरू झाला हे पाहून 'मुक्त बरसे शितलनाथ डेरा' या ओळीची चटकन आठवण होते. येथील शुभ्र धबधब्यांचे उडणारे शुभ्र तुषार व 52 मंदिराच्या शृंखलेतील मंदिर हे श्रावकसह पर्यटकांना भुरळ घालत आहे. जैन श्रावक तसेच पर्यटक यांना सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या हिरव्यागार पर्वतरांगांमध्ये 52 शुभ्र रंगाची



अती पुरातन अद्वितीय शिल्पकलेचा नमुना असलेली ही मंदिरे, हिरवेगार पर्वत, धबधबे, शांत शुभ्र वाहणारी नाग नदी अतिशय रमणीय व नयनरम्य मनाला शांती देणारे ठिकाण, 250 फुटांवरून कोसळणारा शांत व शीतल शुभ्र असा धबधबा व त्याचे उडणारे तुषार जैन श्रावक व अजैन श्रद्धाळू ना आकर्षित करतो आहे. जैनांची काशी संबोधल्या जाणाऱ्या मुक्तागिरिला अतिशय क्षेत्र आहे. साडे तीन कोट्यवधी मुनिराज येथील मोक्ष प्रासी झाले आहे. संपूर्ण भारतातून जैन श्रावक सह पर्यटक येत असतात. तेथे त्यांच्याकरिता संस्थान तर्फे निवास स्थानात निवासाची उत्तम व्यवस्था आहे. जेवणाकरिता जैनी मेस आहे. कार्तिकी पौर्णिमेला येथील 52 मंदिराच्या शृंखलेतील 10 क्रमांक मंदिरात व परिसरातील पहाडावर या कलियुगात ही केशर चा पाऊस पडतो अशी आख्यायिका आहे. तो पर्वत व मंदिर येथे केशरी केशर पाऊस दृष्टीस पडतो. 52 मंदिर परिक्रमा करण्याकरिता 250 पायरी चढत तर उतरते वेळी 350 पायऱ्या उतरावे लागते. तसेच कार्तिकी पौर्णिमेला येथे रथोउत्सव साजरा होतो. यात सागवान च्या लाकडी पासून निर्मित भव्यदिव्य कोरीव काम हाही उत्तम शिल्पकलेचा नमुना आहे. 'रथ उत्सव केशरिया केशरीया आज हमारा रंग केशरीया % आसमंतात दुमदुमतात .पर्वतावरील मंदिर परिक्रमा यालाच जैन लोक वंदना असे म्हणतात. पर्वतावरील 52 मंदिरात नित्य शांतिधारा, पूजा अर्चना नित्य नियमाने होतात. सध्या जैनांचा सर्वात मोठा पूजा अर्चना करणारा उत्सव पर्वाधिराज पर्युषण पर्वाला रविवार 8 सप्टेंबर रोजी सुरुवात झाली आहे. याकाळात मोठ्या प्रमाणात जैन श्रावक यांची दर्शनाला रिघ लागलेली बघायला मिळते.

### मुक्तागिरी येथील दालबाटी मेजवानी खास

मुक्तगिरी येथील दालबाटी ही प्रसिध्द आहे. याचा आस्वाद येथे येणारे हजारो श्रावक सह पर्यटक घेऊन तृप्त होतात. अगदी अल्प दरात उत्तम आधी शुध्द जैन थाळी ही खवय्यांच्या मनात तृप्त करणारी आहे.

